# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः11.05.2024** **वारःशनिवार**

---

1. डॉक्टर नरेंद्र दाभोलकर हत्येप्रकरणी सचिन अंदुरें आणि शरद कळसकर यांना जन्मठेप; तर विरेंद्र तावडे, संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे यांची पुराव्याअभावी सुटका
2. लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यासाठीचा प्रचार आज संपणार
3. राज्यात निवडणूक प्रचारामुळे वातावरण तापलं; दिग्गज नेत्यांच्या जाहीर सभांमधून आरोप प्रत्यारोपांच्या फैरी आणि
4. पुण्यासह राज्याच्या विविध भागात पावसाची जोरदार हजेरी

**दाभोलकर निकाल**

अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे कार्याध्यक्ष डॉक्टर नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्ये प्रकरणी विशेष न्यायालयानं काल 11 वर्षांनी निकाल जाहीर केला. या प्रकरणातील आरोपी वीरेंद्रसिंह तावडें, विक्रम भावे आणि संजीव पुनाळेकर यांची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. तर सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांना जन्मठेपेची शिक्षा आणि 5 लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. विशेष न्यायाधीश पी. पी. जाधव यांनी काल हा निर्णय दिला. डॉक्टर दाभोलकर यांची 20 ऑगस्ट 2013 रोजी पुण्यात बालगंधर्व रंगमंदिराजवळील पुलावर गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. उच्च न्यायालयाच्या आदेशावरून जून 2014 मध्ये या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवण्यात आला होता. दरम्यान दोषी असलेल्या दोघांना शिक्षा देण्याच्या निर्णयाचं दाभोलकर कुटुंबियांनी स्वागत केलं आहे. मात्र पुराव्याअभावी मुक्तता केलेल्यांना शिक्षा व्हावी यासाठी उच्च न्यायालयात जाणार असल्याचं मुक्ता दाभोलकर यांनी म्हटलं आहे. दाभोलकर कुटुंबीयांना शासन सर्व मदत करेल, शासन त्यांच्या सोबत आहे, अशी प्रतिक्रिया या निकालानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. तर या निकालाचं सनातन संस्था स्वागत करत असल्याचं संस्थेचे अभय वर्तक यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत सांगितलं.

**प्रचार**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यासाठीच्या प्रचाराचा आज अखेरचा दिवस आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांचे नेते, उमेदवार झंजावाती प्रचार करत मतदारांना आकर्षित करत आहेत. या चौथ्या टप्प्यात पुणे जिल्ह्यातील पुणे शहर, शिरूर आणि मावळसह औरंगाबाद, जालना, बीड, नंदुरबार, जळगाव, रावेर, अहमदनगर आणि शिर्डी या 11 लोकसभा मतदारसंघांमध्ये, येत्या सोमवारी 13 मे रोजी मतदान होणार आहे.

पंतप्रधान आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी काल नंदुरबार इथं महायुतीच्या उमेदवार हिना गावित यांच्या प्रचारासाठी जाहीर सभा घेतली. अनुसूचित जाती जमाती आणि इतर मागासवर्गाचं आरक्षण कमी करुन धर्माच्या आधारे आरक्षण देऊ देणार नाही, याचा पुनरुच्चार मोदी यांनी यावेळी केला. प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होऊ शकतात अशा आशयाचं वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी काही दिवसांपूर्वी केलं

होतं. त्या अनुषंगाने बोलताना, मोदी यांनी, उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना महायुतीमध्ये सहभागी होण्याचं आमंत्रण दिलं.

दरम्यान, शरद पवार यांनी मात्र मोदी यांचा प्रस्ताव फेटाळला आहे. मोदी यांच्याविरोधात जनमत तयार होत असल्याने ते अस्वस्थ झाले असून संभ्रम निर्माण करणारी विधानं करत असल्याचं पवार म्हणाले. ते काल पुण्यात पत्रकारांशी बोलत होते. आमचा पक्ष गांधी-नेहरुंच्या विचारधारेवर चालतो. समाजातल्या सर्व घटकांना एकत्र ठेवून आम्ही काम करतो, त्यामुळे अशा प्रस्तावाला पाठिंबा देता येणार नाही, असं ते म्हणाले. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही मोदी यांच्या या प्रस्तावावर टीका केली आहे. ते काल मुंबईत पत्रकारांशी बोलत होते.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी काल पुण्यातील महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारासाठी जाहीर सभा घेतली. पुणे शहराचा बकालपणा मोठ्या प्रमाणात वाढतो आहे; योग्य नियोजन झालं नाही तर ही शहरं उद्ध्वस्त होतील. याकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यायला हवं असं मत राज ठाकरे यांनी यावेळी व्यक्त केलं. शहरांच्या प्रश्नांकडे लक्ष जाऊ नये, म्हणून काही नेते तुम्हाला जातीपातीत गुंतवून ठेवत आहेत. मात्र तुम्ही जातीपातीतून बाहेर पडा, असं आवाहन त्यांनी लोकप्रतिनिधींना केलं.

औरंगाबाद लोकसभा मतदार संघातले महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांच्या प्रचारासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी काल छत्रपती संभाजीनगरमध्ये सभा घेतली. तर औरंगाबाद लोकसभा मतदार संघातले महायुतीचे उमेदवार संदिपान भुमरे यांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री आणि शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे यांनीही काल सभा घेतली.

अहमदनगर लोकसभा मत दार संघाचे महायुतीचे उमेदवार सुजय विखे पाटील यांच्या प्रचारासाठी उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी काल अहमदनगर जिल्ह्यात सभा घेतली, तर महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही काल जिल्ह्यात सभा घेतली.

<u>मुख्य निवडणूक अधिकारी</u>

येत्या 13 तारखेला होणाऱ्या चौथ्या टप्प्यातील लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी काल मुंबईत मंत्रालयात पत्रकार परिषद घेतली. या टप्प्यातील मतदानासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज आहे; मतदारांनी उत्स्फूर्तपणे मतदान करावं असं आवाहन त्यांनी केलं. राज्यात चौथ्या टप्प्यात अकरा मतदारसंघांमध्ये 23 हजार 284 मतदान केंद्र तयार करण्यात आली आहेत. या सर्व ठिकाणी मिळून 2 कोटी 28 लाख 1 हजार 151 मतदारांची नोंदणी झाली असून एकंदर 298 उमेदवार निवडणूक लढविणार असल्याची माहिती त्यांनी दिली. राज्यात 7 मे रोजी पार पडलेल्या तिसऱ्या टप्प्यातील निवडणुकीत सरासरी 63 पूर्णांक 55 शतांश टक्के मतदान झाल्याचं चोक्कलिंगम यांनी सांगितलं.

<u>वडेट्टीवार, बावनकुळे</u>

पोलीस अधिकारी हेमंत करकरे यांच्या मृत्यूच्या संदर्भात काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केलेल्या वक्तव्यावरुन त्यांच्याविरोधात नागपुरात गुन्हा दाखल करण्यात आला. तर भाजपानं वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित केलेल्या वादग्रस्त जाहिराती प्रकरणी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याविरोधात ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याची माहिती राज्याचे मुख्य निवडणूक

अधिकारी एस. चोकलिंगम यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत दिली. निवडणूक आयोगाकडे आलेल्या तक्रारींवरुन हा गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचं त्यांनी सांगितलं.

**निवडणूक-पुणे**

पुणे जिल्ह्यातील मावळ, पुणे शहर आणि शिरुर लोकसभा मतदार संघासाठी परवा सोमवारी 13 मे रोजी मतदान होणार आहे, त्यासाठी मतदारांनी निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावरून मतदान केंद्राची माहिती घ्यावी, असं आवाहन जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी केलं आहे. मतदारांच्या सोयीसाठी 1950 हा टोल फ्री क्रमांक देखील उपलब्ध करुन देण्यात आला आहे. पात्र मतदारांनी आपलं नाव मतदार यादीत असल्याची खात्री करुन, कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता मतदानाचा हक्क बजावावा, असं आवाहन डॉ. दिवसे यांनी केलं आहे.

**बाजार समिती**

दरम्यान मतदानाच्या पार्श्वभूमीवर सोमवारी पुण्यातील बाजार समितीचे व्यवहार बंद राहणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपला शेतमाल बाजारात आणू नये असं आवाहन बाजार समिती व्यवस्थापनानं केलं आहे.

**अक्षय तृतीया, बसवेश्वर जयंती, परशुराम जयंती**

साडे तीन मुहूर्तापैकी एक असलेला अक्षय तृतीयेचा सण तसचं परशुराम जयंती आणि बसवेश्वर जयंती काल राज्यात सर्वत्र उत्साहात साजरी करण्यात आली. अक्षय तृतीयेच्या दिवशी नव्या वस्तू, तसंच सोनं चांदी खरेदीसाठी काल बाजारपेठेत उत्साहाचं वातावरण पहायला मिळालं. पुण्यात श्रीमंत दगडुशेठ हलवाई गणपतीला हापुस आंब्यांची आरास करण्यात आली होती. तर बसवेश्वर जयंतीनिमित्त सांगलीमध्ये बसव व्याख्यानमाला, मोफत आरोग्य तपासणी आणि रक्तदान शिबिर तसंच सांस्कृतिक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. पुणे, नवी मुंबई, नांदेड तसंच कोल्हापूरमध्ये विविध ठिकाणी मान्यवरांच्या उपस्थितीत महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं. भगवान परशुराम जयंतीनिमित्त छत्रपती संभाजी नगरसह राज्यात विविध ठिकाणी भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचं पूजन करण्यात आलं.

**अपघात**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर बोरघाटामध्ये काल पहाटे झालेल्या अपघातामध्ये 3 जणांचा मृत्यू झाला; तर 8 जण जखमी झाले आहेत. तीन वाहनं एकमेकांवर धडकल्यामुळे हा अपघात झाला. नांदेड जिल्ह्यात एक जीप येळी महाटी पुलावरून नदीत पडल्यानं झालेल्या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला.

**निधन**

पंढरपूरमधील गुरुजीबुवा राशिनकर फडाचे हरी भक्त परायण आप्पासाहेब महाराज राशिनकर यांचं काल पहाटे निधन झालं, ते 78 वर्षांचे होते. महाराष्ट्रामध्ये वारकरी संप्रदायाचा प्रचार प्रसार त्यांनी केला. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेशमध्ये त्यांचा मोठा शिष्य परिवार आहे.

**पावसाच्या बातम्या**

राज्याच्या अनेक भागात तापमानाचा पारा 40 अंशांच्या पुढे गेल्यामुळे उकाड्यानं हैराण झालेल्या नागरिकांना काल झालेल्या जोरदार पावसानं काहीसा दिलासा मिळाला. काल पुणे, नाशिक, कोल्हापूर, सांगली आणि अहमदनगरमध्ये दुपार नंतर सोसाट्याचा वारा आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसानं हजेरी लावली.

नाशिक जिल्ह्यातील चांदवड तालुक्यात वीज कोसळून एका गायीचा मृत्यू झाला तर 10 ते 12 घरांचं नुकसान झालं. अहमदनगर आणि पुणे जिल्ह्यात काही ठिकाणी शेतपिकांचं नुकसान झालं आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील कागल इथे वीज कोसळून 6 जण जखमी झाले.

**हवामान**

राज्याच्या सर्वच भागांमध्ये तुरळक ठिकाणी आजपासून पुढील चार दिवस जोराचे वारे, वीजा यांच्यासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. विदर्भात काही ठिकाणी गारपीटही होण्याचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.